# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारात, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, मुंबई - ४०० ००१. ई-मेल - msbnpe@gmail.com, दुरध्वनी : ०२२ -२२६२०३६०

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St. Georges Hospital Campus, D' Melo Road, Fort, Mumbai – 400 001.
E-mail- msbnpe@gmail.com, Telephone – 022-22620360

क्र. मराशुवपशिमं/स्त्रीशक्ती/३८९४ /२०२५ दि. १७/११/२०२५

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नित परिचर्या प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय: माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार **"स्त्री शक्ती स्वयं सिद्धा" (Strishakti Swayamsaddha)** उपक्रमांतर्गत राज्यातील सर्व परिचर्या महाविद्यालयांमधील महिला विद्यार्थीनी व कर्मचाऱ्यांची नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ: मा. राज्यपाल सचिवालय, राजभवन, मुंबई यांचे पत्र क्र. RB/Edn.1/Gen-2025/798, Dtd.22/09/2025

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांस अनुसरुन माननीय राज्यपाल सचिवालय, राजभवन, मुंबई. येथील उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत **"स्त्री शक्ती स्वयं सिद्धा" (Strishakti Swayamsaddha)** या उपक्रमाबाबत खालीलप्रमाणे आपणांस कळविण्यात येत आहे.

**"स्वयं सिद्धा" उपक्रमाची आवश्यकता व उद्दिष्ट्ये -**

- मा. राज्यपालांनी "मिशन शक्ती" आणि "आदिशक्ती" या महिला व बाल विकास विभागाच्या कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात विशेष आढावा घेतलेला आहे.
- या अनुषंगाने, महिला सक्षमीकरण (Woman Empowerment) करण्याच्या उद्देशाने **"स्त्री शक्ती स्वयं सिद्धा"** हा उपक्रम विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या महिला विद्यार्थीनींसाठी सुरू करण्यात आला आहे.
- या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट केवळ सक्षमीकरण नसून, महिला सुरक्षेच्या क्षेत्रात संशोधन करणे, लिंग-आधारित अर्थसंकल्पन (Gender Budgeting) करणे आणि विद्यार्थी स्वयंसेवकांच्या मदतीने महिला बचत गटांना मार्गदर्शन करणे हे देखील आहे. (मा. कुलपतींच्या निर्देश क्र. ३१ नुसार)

**तात्काळ कार्यवाहीसाठी निर्देश -**

- मा. राज्यपालांच्या स्पष्ट निर्देशानुसार राज्यातील सर्व शासकीय व खासगी परिचर्या महाविद्यालयांमधील सर्व महिला विद्यार्थीनी आणि महिला कर्मचाऱ्यांची नोंदणीसाठी, **'strishakti.org'** या समाजमाध्यम मंचाचा (social media platform) वापर करून संस्थेचे 'स्वयं सिद्धा प्रोफाइल' तातडीने तयार करावे.
- **"स्त्री शक्ती स्वयं सिद्धा"** या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी आपण आपल्या महाविद्यालयातील तांत्रिक तज्ज्ञांच्या मदतीने तात्काळ कार्यवाही करुन प्रक्रिया पुर्ण करावी.

**वेळेत काम पूर्ण करण्याचे आवाहन -**

- सर्व महिला विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची नोंदणी प्रक्रिया **दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत** शंभर टक्के पूर्ण करणे बंधनकारक आहे. या वेळेत काम पूर्ण करून आपण त्याचा अहवाल तातडीने माननीय संचालक महोदयांकडे सादर करणे.
- **"स्त्री शक्ती स्वयं सिद्धा"** या महत्त्वपूर्ण उपक्रमास वेळेचे बंधन (Time-bound) असल्याने प्राधान्य देऊन तातडीने प्रक्रिया पुर्ण करणे अपेक्षित आहे.

प्रबंधक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत - मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई. ४०० ००१.

↓

# MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION, MUMBAI

## StriShakti Registration Flowchart

**Visit website: strishakti.org**

↓

**Click on REGISTER**

↓

**Enter First Name and Last Name**

↓

**Enter Email**

↓

**Enter Mobile Number**

↓

**Click on SwayamSiddha – YES**

↓

**Select State: Maharashtra**

↓

**Select District**

↓

**Select Taluka**

↓

**Enter Address (same as district name)**

↓

**Select Role: Student**

↓

**Select University: MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING & PARAMEDICAL EDUCATION, MUMBAI**

↓

**Select College (Register your college first if not listed)**

↓

**Select Department: Department of Nursing Diploma Courses**

↓

**Select School: N/A**

↓

**Select Study Centre: N/A**

↓

**Select Stream: Diploma**

↓

**Enter Date of Birth**

↓

**Enter Desired Password**

↓

**Click I Agree to Terms & Conditions**

↓

**Click REGISTER**